25 "A note on the plight of Harijan women in Uttar Pradesh" Vimal Randive

नॅशनल लेबर इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली, या संस्थेतर्फे सामाजिक परिवर्तनासाठी सामाजिक कृति यावर नोव्हेंबर १९७४ मध्ये एका सेमिनारमध्ये एक अहवाल सादर केला गेला. हा अहवाल उत्तर प्रदेशात उत्तर काशी डोंगराळ जिल्ह्यातील पुरीला या खेड्यातील अत्यंत मागासलेल्या अशा १५० कुटुंबांच्या मुलाखती घेऊन तयार केला गेला. ही सारी कुटुंबे हरिजन (बागजी) व पिढ्यानपिढ्या सरंजामी वेठबिगारीत वाढलेली. त्यांचे सारे आयुष्य आपल्या सावकार जमीनदार मालकाकडे राबलेले. अशा कुटुंबातील १५ ते २५ वयाच्या तरुणींना कर्जबाजारीपणातून मुक्त होण्यासाठी वेश्या व्यवसायाखेरीज दुसरा मार्ग नव्हता. इतके दारिद्र्य कुटुंबात ओतप्रोत भरलेले होते. या गावातील सुंदर तरुणी हिरव्याचार खेड्यातून आज दिल्ली, मीरत, मुझफ्फरपूर या कुंटणखान्यात पाठविल्या जातात. या भागात कायदा व्यवस्था अशी काही गोष्टच नाही. जो काही कायदा म्हटला जातो तो पोलीस, पटवारी, वरिष्ठजातीतील रजपूत, हिंदू जमीनदार व त्यांचे दलाल हे अंमलात आणतील तोच कायदा.

--- विमल रणदिवे

उत्तर प्रदेशातील हरीजन महिलांच्या जीवनावर थोडा प्रकाश